# लोकनृत्य चषक आजरा महाविद्यालयास

**आजरा / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवातील लोकनृत्य या प्रतिष्ठेच्या आणि चुरशीने झालेल्या कला स्पर्धा प्रकारामध्ये आजरा महाविद्यालयाच्या संघाने प्रथम क्रमांक पटकावला आणि सलग दुसऱ्या वर्षी सरदार माने चषक राखला. याशिवाय पाश्चिमात्य समूहगीत, नकला, मातीकाम स्पर्धेतही महाविद्यालयास पारितोषिके प्राप्त झाली.

सांगली येथील विलिंग्डन महाविद्यालयात ३१ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत विद्यापीठाचा मध्यवर्ती युवा महोत्सव पार पडला. यावेळी त्रिपुरा राज्यातील 'होजागिरी' हे लोकनृत्य आजरा महाविद्यालयाने अत्यंत प्रभावीपणे सादर केले. तीन विभागांतून क्रमांक मिळवलेल्या पहिल्या तीन संघांच्या मिळून नऊ लोकनृत्यामध्ये आजरा महाविद्यालयाने सादर केलेल्या या नृत्यास यशस्वितेची पोच या चषकाने मिळाली. सह्याद्री वाहिनीवर होणाऱ्या लोकनृत्य स्पर्धेसाठी या नृत्याची निवड ही झाली आहे.



आजरा महाविद्यालयाने सादर केलेल्या लोकनृत्यातील एक क्षण.

सांगलीचे पालकमंत्री सुभाष देशमुख, खासदार संजयकाका पाटील, आ. सुधीर गाडगीळ, विद्यार्थी कल्याणचे डॉ. आर. बी. गुरव, प्राचार्य डॉ. ताम्हणकर यांच्या प्रमख उपस्थितीत झालेल्या कार्यक्रमात बक्षिसाचे वितरण झाले. याशिवाय नकलामध्ये पहिला, वेस्टर्न ग्रुप साँगमध्ये दुसरा, तर मातीकाम कला प्रकारात तिसरा क्रमांक महाविद्यालयास मिळाला. लोकनृत्यामध्ये मीनाक्षी दोडमणी, धनश्री सुतार, शुभांगी दोरुगडे, प्रियांका वाजंत्री, प्रियांका गुरव, वर्षा कांबळे, विद्या मोरबाळे, उषा पाटील, पास्किन फर्नांडिस, अलिना फर्नांडिस यांचा सहभाग होता, तर नकला मयूरी वझरेकर हिने सादर केल्या. वेस्टर्न साँग मयूरी वझरेकर, पास्किन फर्नांडिस, अलिना फर्नांडिस, प्रियांका निठूरकर, ऋतुजा शिंदे आणि कोमल कळेकर यांनी व मातीकाम दिनेश सुतार याने सादर केले.

डॉ. आनंद बल्लाळ, प्रा. रमेश चव्हाण, अमित घरत (मुंबई) अनिकेत पोवार यांचे मार्गदर्शन, तर जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी, प्राचार्य डॉ. एम. एल. होनगेकर यांचे प्रोत्साहन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 NOV 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विवेकानंद कॉलेजची बाजी

कोल्हापूर टाइम्स टीम

सांगली येथील विलिंग्डन कॉलेज येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या ३८ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात बारा कलाप्रकारात यश मिळवून सर्वसाधारण विजेतेपदाचा अभिजित कदम फिरता करंडक पटकावला. सलग ११ वर्षांपासून सर्वसाधारण विजेतेपदावर नाव कोरण्याची परंपरा विवेकानंदच्या विद्यार्थ्यांनी यंदाही कायम राखली.



**जनरल चॅंपियनशीपची ११ वर्षांची परंपरा कायम**

या महोत्सवात पाश्चिमात्य समूहगीत गायन, पाश्चिमात्य एकल वादन, एकांकिका, लघुनाटिका, शास्त्रीय सूरवाद्य या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. सांघिक रचनाकृती भारतीय समूहगीत , सुगमगीत स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. लोकनृत्य, रांगोळी, लोकसंगीत वाद्यवृंद, व्यंगचित्रण या स्पर्धांमध्ये तृतीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक स्पर्धांमधील सर्वाधिक पारितोषिके विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी मिळवली. विजेत्या स्पर्धकांना राज्याचे सहकारमंत्री व सांगलीचे पालकमंत्री सुभाष देशमुख , खासदार संजय पाटील यांच्या हस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले. कॉलेजने दरवर्षीच शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्सवावर आपला ठसा उमटवला आहे. विविध कलाप्रकारांत यश मिळवून यंदाही सर्वसाधारण विजेतेपद आपल्याकडे राखण्यात यश मिळवले.

सर्वसाधारण विजेतेपदासह यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे विवेकानंद कॉलेजतर्फे उत्साहात स्वागत करण्यात आले. यावेळी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सचिव प्राचार्य शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्यासह प्राध्यापकांनी विविध कलाप्रकारांमध्ये सहभागी असलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पुढारी

# फटाक्यांचा आवाज झाला कमी

## हवा प्रदूषणाबाबत जनजागृतीचा परिणाम; न्यायालयाच्या निर्णयाचाही आदर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दिवाळी म्हणजे पहाटेपासून दिवसभर फटाक्यांचा कर्णकर्कश आवाज, असे मानले जाते. पण, यंदा मात्र अपवाद वगळला तर मोठ्या आवाजाचे फटाके खूप कमी प्रमाणात वाजवल्याचे दिसून आले. याचे कारण मोठ्या आवाजाच्या फटाक्यांवरील निर्बंध आणि समाजामध्ये हवा प्रदूषणाबाबत झालेली जागृती असल्याचे दिसून येते.

दिवाळीला एका सुतळी बॉम्बच्या आवाजाने परिसरातील आठ-दहा घरांतील रॅकवरील भांडी पडायची असे चार-दोन वर्षांपूर्वीपर्यंतचे चित्र होते. दोन-तीन मिनिटे वाजणाऱ्या फटाक्यांच्या माळांचीसुद्धा मोठी क्रेझ असायची. पहाटे चारच्या



ठोक्यापासून फटाक्यांच्या आवाज सुरू झाला की दिवसभर हे चित्र दिसायचे. पण, दोन-तीन वर्षांपासून फटाके आणि प्रदूषण याबाबत मोठ्या प्रमाणावर जनजागृती सुरू झाली. फटाक्यांचा धूर हा आरोग्याला हानिकारक असल्याने अनेकांना या धुरामुळे आजार जडत असल्याच्या घटना समोर आल्या. शाळांमध्ये फटाकेबंदीचे उपक्रम काही स्वयंसेवी संस्थांकडून यशस्वीपणे करण्यात आले.

फटाके वाजवण्यापेक्षा निसर्गसहलीचा आनंद लुटा या उपक्रमालाही मोठा प्रतिसाद मिळत गेला. या साऱ्यांचा परिणाम आता प्रत्यक्ष दिसू लागला आहे. कारण मंगळवारी मोठ्या फटाक्या खूप कमी प्रमाणावर उडवण्यात आल्या. त्याऐवजी फॅन्सी आयटमचे प्रकार लोकांनी वापरल्याचे दिसून आले. कमी आवाज आणि कमी धुराचे फटाके वाजल्याने साहजिकच लोकांनाही दिवाळीचा आनंद लुटता आला.

“

दिवाळीला लहान मुलांनी मोठ्या आवाजाचे फटाके शक्यतो टाळल्याचे दिसून आले. त्यामुळे दिवाळीचा आनंद सर्वांनाच लुटता आला. आता व्यापारी व व्यावसायिकांनीही या गोष्टीचे अनुकरण करावे. वहीपूजनाच्या निमित्ताने फटाके मोठ्या प्रमाणात फोडले जातात. त्यामुळे प्रदूषण वाढत असल्याचे आमच्या सर्वेक्षणातून सातत्याने दिसून आले आहे.

**–डॉ. पी. डी. राऊत,** विभागप्रमुख, पर्यावरण अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ